## माजी विद्यार्थी स्नेहमेळावा- अहवाल

महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांशी सुसंवाद प्रस्थापित करणे, त्यांचे महाविद्यालयाशी असलेले भावनिक नाते अधिक दृढ करणे तसेच संस्थेच्या विकासामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग वाढविणे या उद्देशाने डॉ. शांतीलाल धनजी देवसी कला महाविद्यालय आणि वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडा येथे दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या चर्चासत्र सभागृहात "माजी विद्यार्थी स्नेहमेळावा – आठवणींना उजाळा" या कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले.


कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे सरचिटणीस श्री. विशाल कुलकर्णी हे होते. कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. डॉ. किशोरी भगत यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कैलास जोशी यांनी प्रास्ताविकाने केली. त्यांनी माजी विद्यार्थी संघटनेचे महत्त्व, संस्थेच्या प्रगतीमध्ये माजी विद्यार्थ्यांचे योगदान तसेच स्नेहमेळाव्याच्या आयोजनामागील उद्दिष्टे याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यानंतर प्राचार्या प्रा. डॉ. किशोरी भगत यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त करून सर्व माजी विद्यार्थी, मान्यवर व उपस्थितांचे स्वागत केले. त्यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेत माजी विद्यार्थ्यांचे संस्थेशी असलेले नाते अधिक दृढ करण्याची आवश्यकता अधोरेखित केली.यानंतर श्री. युवराज ठाकरे, श्री. वैभव  ठाकरे, श्री. नंदन पाटील, कु. प्रांजल भोईर आणि सौ. रूपाली आंबवणे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी महाविद्यालयातील शिक्षणकाळातील संस्मरणीय आठवणींना उजाळा देत शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली तसेच महाविद्यालयातून प्राप्त झालेल्या ज्ञान, संस्कार आणि मार्गदर्शनामुळे त्यांच्या जीवनात झालेल्या सकारात्मक परिवर्तनाचा उल्लेख केला.

या स्नेहमेळाव्यास ३०० हून अधिक माजी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदविला. विविध वर्षांतील माजी विद्यार्थ्यांना एकमेकांशी संवाद साधण्याची, जुन्या आठवणींना उजाळा देण्याची तसेच महाविद्यालयाशी असलेले ऋणानुबंध अधिक दृढ करण्याची ही एक संस्मरणीय संधी ठरली.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. निलेश हाळीकर यांनी केले. सर्व मान्यवर, माजी विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व आयोजन समितीच्या सहकार्यामुळे हा स्नेहमेळावा यशस्वीरीत्या संपन्न झाला.

विभाग प्रमुख
मराठी विभाग
शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे,क
बिज्ञान महाविद्यालय,वाडा,जि.ठा


Shikshak Sanchalit Shikshan Sanstha's
Dr. Shantilal Dhanji Devsey
Arts College and Commerce
and Science College Wada
Dist. Palghar
Accredited by NAAC with "B" Grade
11th January, 2025, Saturday
@ 10:00am onwards @ College premise


माजी
विद्यार्थी
स्नेहमेळावा


Dr. Shantilal Dhanji Devsey
Arts College and Commerce
and Science College Wada
Dist. Palghar
Alumni
Meet
11th January, 2025, Saturday
@ 10:00am onwards @ College premises
Principal






SHIKSHAN SANCHALIT SHIKSHAN SANSTHA'S
DR. S. D. DEVSEY ARTS COLLEGE & COMMERCE & SCIENCE COLLEGE, WADA DIST-PALGHAR
ESTD-1981-82
(FORMERLY-ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE WADA)
(AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBA
NO MASK NO ENTRY



